# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २५५ - २३** **दिनांक : - ०९/०८/२०२३**

## मोटारसायकल चोरी करणाऱ्या चोरटयाला अटक करुन ४ गुन्हांची उकल काशिमीरा पोलीस ठाणेची कामगीरी

काशिमीरा पोलिस ठाणे कार्यक्षेत्रातील फिर्यादी श्री. यामीन मुजीद धोबी-५२ वर्षे,रा.- मिरा-गावठाण, हणुमान मंदीर जवळ, मिरारोड पुर्व यांनी त्यांचे मालकीची १,००,०००/-रुपये किंमतीची KTM मो.सा.नं.MH-03 EA-8657 ही दि.२४.०७.२०२३ रोजी ००.३० वा. ते दि.२५.०७.२०२३ रोजी ०५.०० वा. दरम्यान राज बेकरीसमोर, मिरा-गांवठाण येथुन अज्ञात चोरटयाने चोरून नेले बाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून काशिमीरा पोलिस ठाणे गु.रजि.नं.५३५/२०२३ भा.द.वि.सं.क.३७९ प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

काशिमिरा पोलीस ठाणे हद्दीत घडणा-या मोटार सायकल चोरीच्या गुन्हयांची दखल घेवून वरिष्ठांनी सुचना व मार्गदर्शन केले होते. गुन्हयाचे तपासात घटनास्थळ व घटनास्थळाचे आजुबाजुच्या सी.सी.टि.व्ही. कॅमेरे फुटेजची तपासणी तसेच मिळालेल्या गुप्त माहीचीत्या आधारे सदरची मोटार सायकल ही निर्मलनगर, नालासोपारा पुर्व येथे आढळून आली. नमुद मोटारसायकल उभ्या असलेल्या परिसरात सापळा रचुन मोटारसायकल घेणे करीता आलेला इसम नामे मिलींद मनोहर सावंत वय- २७ वर्षे, व्यवसाय- मेकॅनिक, रा.रु.नं.१४, रेणुका एस.आर.ए.बिल्डींग, रेणुकानगर, न्यु लिंकरोड, कांदीवली प.मुंबई यास ताब्या घेवुन त्याचेकडे तपास केला असता त्यांनी वर नमुद गुन्हा केल्याचे तपासा निष्पन्न झाले.अटक आरोपीत यांचेकडे अधिक तपास केला असता त्याने चोरी केलेल्या एकुण ४ मोटारसायकल त्याचेकडुन जप्त करण्यात आल्या आहेत.मुंबई पोलिस आयुक्तालयातील ३ व काशिमीरा पोलिस ठाणेचा १ असे एकुण ४ गुन्हे उघडकीस आले आहेत.

**-उघडकीस आलेले गुन्हे -**

| अ.क्रं | पोलीस ठाणे | गु रजि नं व कलम | मोटर सायकल क्रं |
|---|---|---|---|
| १) | काशिमिरा पोलीस ठाणे | गुरजिनं. ५३५/२०२३ भा.द.वि.सं.क.३७९,४६५, ४६७, ४६८,४७१,३४ (मुळ गुन्हा) | MH-03/EA-8657 |
| २) | दिंडोशी पोलीस ठाणे | गुरजिनं. २४०/२०२३ भा.द.वि.सं.क.३७९ | MH-02/BH-0419 |
| ३) | मेघवाडी पोलीस ठाणे | गुरजिनं. २४७/२०२३ भा.द.वि.सं.क.३७९ | MH-02/ EH-6849 |
| ४) | दहिसर पोलीस ठाणे | गुरजिनं. ७१२/२०२३ भा.द.वि.सं.क.३७९ | MH-04/ EN-9122 |

आरोपीत याचेकडुन चोरीस गेलेल्या ०४ मोटार सायकल, वेगवेगळया नंबरप्लेट, बनावट आर.सी.बुक, चेसीस टुल कीट, कलर स्प्रे, स्विच असा एकुण २,२१,३६०/रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर कामगीरी श्री.जयंत बजबळे, पोलीस उपआयुक्त परिमंडळ-०१, श्री. महेश तरडे, सहाय्यक पोलीस आयुक्त मिरारोड विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि काशिमीरा पोलिस ठाणे श्री.संदिप कदम, पो.निरी.श्री.कुमारगौरव धादवड(गुन्हे), स.पो.निरी. योगेश काळे, पोउनि शिवाजी खाडे, स.फौ.अनिल पवार,इगवे, पो.हवा.वारे, पाचुंदे, अक्षय पाटील, राहुल सोनकांबळे, निलेश शिंदे, स्वप्नील मोहीले, पो.अं.रवी कांबळे, प्रविण टोंबरे, किरण विरकर,सुरेद्र सुर्यवंशी यांनी केलेली आहे.

----ooo-----